नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.२७३**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०७ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - विनायक कुंडलीक बोरसे,
वय - ४२ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - देवधाबा, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझ्या नावाने १ हेक्टर ५१ आर अशी सामायिक शेती शिरसाळा शिवारात आहे. तसेच माझ्या वडीलांकडे देवधाबा येथे ६९ आर शेती असून त्याचा गट क्र. २२ आहे. शिरसाळा येथील जमीन गट क्र. १३१ व १३० असे आहे. सध्या मी दोन्ही गटात कपाशी पेरली आहे. सन २०२२-२३ मध्ये मी सदर दोन्ही जमीनीत कपासी पेरली होती. त्यावेळेस ७०००/- प्रति क्वींटल असा भाव होता. सन २०२२-२३ मध्ये ५२ क्वींटल ८० किलो इतके उत्पादन झाले होते. मी कपासी घरून विक्री करतो. घरी व्यापारी येतात. मी सन २०२२-२३ चा कापूस जगन्नाथ रामचंद्र नारखेडे याला विकला होता. तो कापूस मी ९,०००/- प्रति क्वींटल या भावाने विकला होता. तो माल मी चाळीस दिवसाच्या उधारीवर ठरला असून पहिला टप्पा वीस दिवसाला अरधे पैसे व उर्वरित पैसे पुढच्या वीस दिवसाने द्यायचे ठरले होते. दि. २४.०७.२०२३ रोजी कापूस गाडीत भरला. त्या दिवशी मला आरोपी क्र. १ ने ५५,०००/- रूपये नगदी दिले. त्यावेळी आरोपीची गाडी आली होती. त्या गाडीचा फोटो माझ्याकडे आहे. मला त्या गाडीचा क्रमांक आठवत नाही. आरोपी क्र. १ ने ठरल्याप्रमाणे पैसे दिले नाहीत. त्यानंतर त्याने ७,०००/- रूपये प्रति क्वींटलने जी रक्कम होते त्या रक्कमेचा चेक दिला. त्याने असेही म्हटले की, त्याला तोटा झालेला आहे असे म्हणून त्याने मला उर्वरित ३,१४,६००/- इतक्या रक्कमेचा धनादेश दिला. आता मला सदर धनादेशाची अस्सल पासून पडताळणी केलेल्याची प्रत दाखविण्यात आली. तो तोच धनादेश आहे. सदर धनादेशावर आरोपी क्र. १ ची सही आहे. त्याला **निशाणी क्र. २७४** देण्यात आला. सदर धनादेश हा मी माझी बँक आय.डी.बी.आय येथील खात्यात जमा केला असता

तो धनादेश अनादरीत झाला. सदर धनादेश अनादरीत झाल्याबाबत बँकेने मला मेमो दिला होता. आता मला अस्सल पासून पडताळणी केलेल्या मेमोची प्रत दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **निशाणी क्र. २७५** देण्यात आला. त्यानंतर मी माझ्या विधीज्ञांमार्फत आरोपी क्र. १ यास नोटीस पाठवली. आता मला माझ्याकडे असलेल्या स्थळप्रतीपासून पडताळणी केलेलया नोटीसीची प्रत मला दाखविण्यात आली. त्यावर माझी व माझे विधीज्ञांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २७६** देण्यात आला. आता मला अस्सल पासून पडताळणी केलेले पावतीची प्रत दाखविण्यात आली. त्यास **निशाणी क्र. २७७** देण्यात आले. सदर नोटीस ही आरोपी जगन्नाथ नारखेडे याने स्वीकारलेली नाही. ती नोटीस न स्वीकारल्यामुळे ती परत आली. आता मला अस्सल पासून पडताळणी केलेल्या लिफाफयाची प्रत दाखविण्यात आली. त्यास **निशाणी क्र. २७८** देण्यात आला. मी सन २०२२-२३ मध्ये कापूस पेरला होता हे दाखविण्याकरिता मी पोलीसांना ७/१२ च्या छायांकित प्रती दिल्या होत्या. आता मला जमीन गट क्र. १३० व १३१ चे प्रत्येकी दोन ७/१२ उतारे व जमीन गट क्र. २२ चा एक ७/१२ उतारा दाखल केला असून त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. २७९ ते २८३** देण्यात आले. मी आरोपी क्र. १ ला पुर्वीपासून ओळखत नाही. ज्यावेळेस कापूस विकत घ्यायचे ठरले त्यावेळेसपासून मी त्याला ओळखतो. आरोपी हा व्हीडीओ कॉन्फरन्सींद्वारे हजर असून त्यास मी ओळखतो. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. मी जे आज न्यायालयात कथन केले ते याआधी मी कोणालाही सांगितले नव्हते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....**

०२. हे म्हणणे खरे आहे की, जे लोक कापूस मोजायला असतात त्यांना मापारी म्हणतात. तो कापूस ते पहिले मोजतात व त्याची काटेपट्टी तयार केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, कापूस गोण्यात भरून मापारी लोक तानकाट्याला लावून कापूस मोजतात. गोण्यात भरलेला कापूस हा त्यानंतर गाडीत खाली केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, एका गोण्यात साधारण एक ते दीड क्वींटल कापूस भरतो. हे म्हणणे खरे आहे की, मोजलेल्या कापसाची गोनी नंबर व त्या गोनीमध्ये भरलेल्या एकूण कापसाचे वजन अशी मापरी काटापट्टीमध्ये नोंद

घेतो. हे म्हणणे खरे आहे की, जेवढ्या गोण्या भरल्या जातात त्याचे एकत्रीत वजन मापरी लोक काढत असतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या काट्या पट्टयाची एक प्रत व्यापा-याला देण्यात येते व दुसरी प्रत शेतक-याला दिली जाते.

०३. मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे गाडीचा काढलेला फोटो तपासाकामी पोलीसांना दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेला धनादेश हा समर्थ शेतकरी सेवा संस्थेचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या वेळेस मी आरोपीला नोटीस पाठविली होती त्यावेळी तो बुलडाणा जेलमध्ये बंद होता. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २७८ वर पोलीसांची सही किंवा शिक्का नाही आहे. मी पोलीसांना बयाण देतेवेळी त्यानंतर त्याने ७,०००/- रूपये प्रति क्वींटलने जी रक्कम होते त्या रक्कमेचा चेक दिल्याचे, त्याने असेही म्हटले की, त्याला तोटा झालेला आहे असे सांगितले होते. सदर बाबी माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी आरोपी क्र. १ विरुध्द कोणतीही वसुलीची कार्यवाही केली नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी त्यानंतर मी माझ्या विधीज्ञांमार्फत आरोपी क्र. १ यास नोटीस पाठवली व ती नोटीस त्याने न स्वीकारल्यामुळे परत असल्याचे सांगितले होते. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४. मी पोलीसांना दिलेल्या जबाबात आरोपी क्र. १ हा एजंट असल्याचे सांगितले आहे. मी पोलीसांना आरोपी क्र. १ हा कोणातर्फे एजंट म्हणून माल घेत आहे असे मी पोलीसांना सांगितल्याचे मला आठवत नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, आपल्या भागात जो कापूस लावला जातो त्याची पेरणी जून महिण्यात होते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वसाधारणपणे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात व सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून कापसाचे वेचे चालू होतात. हे म्हणणे खरे आहे की, वर्षभरात आलेला कापूस हा शेतकरी विकत असतो. हे म्हणणे खरे आहे की, ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू झालेला कापसाचा वेचा हा मार्च महिन्यापर्यंत चालतो.

०६. माझे शिक्षण आठवी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे बँकेत खाते असून मला व्यवहार समजतो. हे म्हणणे खरे आहे की, पन्नास हजार रुपयांच्या वरची रक्कम ही नगदी स्वरूपात घेता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आपल्या भागात असलेल्या शेतीमध्ये जर शेती कोरडवाहू असली तर त्यामध्ये सर्वसाधारणपणे ५ ते ८ क्वींटल प्रती

एकरी कापूस होतो व जर शेती बागायती असली तर त्यामध्ये सर्वसाधारण १० ते १२ क्वींटल प्रति एकरी कापूस होतो.

०७. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२२ -२३ मध्ये मी माझ्या शेतात कापूस लावला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, कापसाची रक्कम ही चाळीस दिवसात देण्याचे ठरले असून पहिला टप्पा हा वीस दिवसाने असून उर्वरित रक्कम ही त्याच्या वीस दिवसानंतर ठरल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जगनने स्वतःहून माझ्याकडून कोणताही कापसाचा माल विकत घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ विरुध्द पोलीस स्टेशनला कोणतीही फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे असलेल्या जमीनीत मी कापूस पेरला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ कडून मी दिलेल्या कापसापोटी ३,१४,६००/- रुपये येणे होते व ते त्याने दिले नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ याला कोणताही कापसाचा माल विकलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटा जबाब दिलेला आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....**

०८. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ सोडून इतर आरोपींचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी इतर आरोपींना ओळखत देखील नाही.

**उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....**

०९. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....**

१०. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....**

११. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....**

१२.        आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

१३.        आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....</u>**

१४.        आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

१५.        आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१६.        आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.08.06 18:01:56 +0530

दिनांक : ०६/०८/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर